# शिक्षण, प्रशिक्षणाशिवाय यश हे अपयशच !

सहकाराचे २००८ - ०९ हे आर्थिक वर्ष ३१ मार्च २००९ रोजी संपत आहे. २००९ - १० हे सहकारी आर्थिक वर्षे १ एप्रिल २००९ रोजी सुरु होत आहे. राज्यातील २ लाख ५ हजार सहकारी संस्थांना आपला लेखा जोखा सभासदांसमोर मांडण्यासाठी १४ ऑगस्ट २००९ ही अंतिम मुदत आहे. वार्षिक सर्वसाधारण सभा कुठल्याही परिस्थितीत १४ ऑगस्ट २००९ पूर्वी घेवून आपली कायदेशीर जबाबदारी आपणा सर्वांना पूर्ण पाडावयाची आहे.

या निमित्ताने संस्थेचे लेखापरिक्षण होणे आवश्यक आहे. प्रत्येक संस्थेने यासंदर्भात संबंधित सहकारी निबंधकास विशेष पत्र पाठवून आपल्या संस्थेचे लेखापरिक्षण करुन घेणेसाठी पत्र देवून त्याची पोच घेणे आवश्यक आहे. एका संस्थेवर एका पेक्षा दोन लेखापरिक्षकांची नेमणूकीची पत्रे प्राप्त झाल्यास, पहिले नेमणूकीचे पत्र ज्यांचे आहे, त्यांचेकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे. आणि **नंतरच्या लेखापरिक्षकास कुठल्याही परिस्थितीत लेखापरिक्षण करु देवू नये**. किंबहुना तशी जबरदस्ती केल्यास रितसर तक्रार संबंधित निबंधकास करुन वेळ पडल्यास संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये **अशा खंडणी वसुल करण्याच्या अप्रत्यक्ष कामकाजाबद्दल** दाद मागावी.

वास्तविक अशी एकापेक्षा अधिक लेखापरिक्षण नियुक्तीची पत्रे आल्यास संस्थेने काय करावे ? याचे ज्ञान असणे आवश्यक असताना देखील, संस्था कारण नसताना व गरज नसताना इतर सोपस्कर करण्यास वेळ घालवीत असतात. आणि हेच सहकाराचे अपयश आहे. संस्था कितीही सुस्थितीत व योग्य आर्थिक फायद्यात असली तरी, असे शिक्षण प्रशिक्षणाशिवाय मिळालेले यश ही, भविष्यकाळातील अपयश आहे हे समजून घेणे क्रमप्राप्त आहे.

प्रामुख्याने राज्यातील १८ हजाराच्यांवर नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या कार्यकर्त्यांनी जागरूकता दाखविणे गरजेचे आहे. कलम १०१ खाली थकीत कर्जवसुलीचे दाखले मिळविणेसाठी राज्यातील अनेक फेडरेशन्स, जिल्हा बँका, असोशिएशन यांचे स्तरावर हे कर्ज वसुली दाखले मिळविणेसाठी आपल्या अखरत्यारीत यंत्रणा उभारल्यामुळे, संबंधित सहाय्यक निबंधकांची थकीत कर्जवसुली दाखले देण्याच्या कार्यक्रमास आपोआप गळती लागली आहे. त्यामुळे साधारणपणे प्रती केस ५०० रुपये लुबाडणूक करण्याचा धंदा संबंधित दलालांचा बंद होत आहे. त्यामुळे लेखापरिक्षणाच्या नावाखाली एका एका संस्थेवर एका पेक्षा अधिक ऑडीटरर्स नेमण्याचे धंदे चालू आहेत. ही कृती पूर्णपणे बेकायदेशीर आहे. **कृती करणारे व कृती करण्यास लावणारे दोघेही यात दोषी आहेत.** परंतु अशा बेकायदेशीर कामाबद्दल कुठलीही संस्था उघडपणे लेखी विरोध करण्यास तयार नाही. कारण संबंधित यंत्रणा संस्थेस केव्हा अडचणीत आणेल, हे सांगता येणार नाही असा समज दिवसेंदिवस दृढ होत चालला आहे. आणि हा समज व वस्तुस्थिती दूर करणेसाठी या क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी आपल्या संस्थेचा उपविधी व सहकार कायदा शांतपणे वाचून समजून घेतला व त्याचे अतिरिक्त प्रशिक्षण घेतले तर, वरील प्रत्येक प्रश्न व अडचणींवर विनामूल्य उत्तर आपल्याकडेच आहे हे लक्षात येईल. यासाठी मुंबईमध्ये प्रामुख्याने सहकारी पतसंस्थांसाठी बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन अत्यंत जागरूकपणे या अडचणीवर मात करण्यासाठी स्वतःहून पुढे आली आहे. त्याचा फायदा प्रत्येक पतसंस्थेने संस्थेच्या आर्थिक भरभक्कम पायभरणी व पतसंस्थांच्या ठेवीच्या संवर्धनासाठी त्याचा उपयोग करुन घेतला पाहीजे.

बृहन्मुंबई नागरी पतसंस्था फेडरेशनने ज्यांच्या विरोधात कलम १०१ / ९१ अन्वये ॲवार्ड प्राप्त झालेले

आहेत त्या कर्जदार व जामिनदारांची नावे, रक्कम, दिनांक , पत्त्यासहीत प्रसिध्द करुन पतसंस्थांना अडचणीत आणणा-यांची WWW.MAHASAHAKAR .COM. वेबसाईट नुकतीच कार्यन्वीत केली आहे. सरकारने या संबंधी मान्यता देऊन पतसंस्थांना या वेबसाईटचा चांगला उपयोग व्हावा व थकबाकीदारांना त्यांच्या थकीत रकमा पतसंस्थांमध्ये भरल्या जाव्यात हयासाठी **ही वेबसाईट थकबाकी वसुलीवर रामबाण उपाय** "दिवसेंदिवस लोकप्रिय होत चालले आहे. यासाठी पतसंस्थांनी त्वरीत बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., ११२, सौरभ बिल्डींग, मोदी इस्टेट, एल्.बी.एस्. मार्ग, घाटकोपर (प.), मुंबई - ४०० ०८६, वेळ सकाळी १०.३० ते ५.३० येथे संपर्क साधावा, जेणेकरुन थकबाकी वसुलीची जटील समस्या सुटण्यास मदत होईल.

या वेबसाईटमुळे कुठल्याही थकीत कर्जदार व जामीनदार (कलम १०१ व ९१ खाली ॲवार्ड मिळालेले) त्या त्या संस्थांची ॲवार्ड मधील रक्कम भरल्याशिवाय वेबवाईट मधील नावे कमी होणार नाहीत. व दुस-या पतसंस्था मध्ये सुध्दा कर्जही घेवू शकणार नाहीत. किंबहुना अशा प्रकारच्या थकबाकीदारांना दुस-या पतसंस्थांनी कर्ज देवून ठेवीदारांच्या रकमा धोक्यात आणता येणार नाही अशी मूळ भूमिका व उद्देश आहे.

ही वेबसाईट सुध्दा शिक्षण व प्रशिक्षणाच्या पुढाकाराने उदयास आली आहे. मात्र ह्याच फेडरेशनने राज्यातील २ लाख ५ हजार सहकारी संस्थांसाठी **अधिनियम व नियम** एकत्रित करून अत्यंत सुटसुटीत महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे सहकारी कायदा पुस्तक **प्रशिक्षण आवृत्ती म्हणून प्रसिध्द केले आहे.** राज्यभर या कायदा पुस्तकाचे स्वागतच होत आहे. आणि हा शिक्षण प्रशिक्षणाचाच भाग असल्यामुळे प्रत्येकाला आपले सहकारातील दायीत्व सिध्द करण्याची ही वेळ व पध्दत आहे. यासाठी या अग्रलेखाव्दारे शिक्षण प्रशिक्षणाची भूमिका विषद केली आहे.

राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व त्यांचे अखत्यारीतील ३१ जिल्हा सहकारी बोर्ड , १३ प्रशिक्षण केंद्र, २ कॉलेज (पुणे व नागपूर ) याशिवाय बँका - पतसंस्थांसाठी व इतर सहकारी संस्थांसाठी विविध सहकारी फेडरेशनस् शिक्षण प्रशिक्षणाचे काम आपापल्या स्तरावर करीत आहेत. त्यासाठी हजारो अधिकारी / कर्मचारी दैनंदिन काम करीत असून शासनने त्यांना शिक्षण प्रशिक्षण तसेच सहकाराचा प्रचार व संशोधनाचे काम कायद्यान्वये करुन देण्यासाठी तरतूद केली आहे. आणि शिक्षण प्रशिक्षणानेच सहकारी चळवळीत राहून न्याय मिळू शकतो व देऊ शकतो हेच अंतिम सत्य आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !**